**दि. १ सप्टेंबर, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०२७ या कालावधीमध्ये "महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान" राबविण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय संकीर्ण :- मराअ-२०२५ /प्र.क्र. २७ /समन्वय-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ ऑगस्ट,२०२६

**प्रस्तावना :**

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक (Quasi-Judicial) न्यायालयांमध्ये जमिनींशी संबंधित महसुली दावे मोठ्या प्रमाणावर दाखल होतात. विविध कारणांमुळे हे दावे प्रलंबित राहिल्याने पक्षकारांचा वेळ व पैसा मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. तसेच, एका स्तरावर निकाल लागल्यानंतर असंतुष्ट पक्षकार वरिष्ठ न्यायालयात पुन्हा अपील अथवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात, ज्यामुळे हे दावे वर्षानुवर्षे सुरू राहतात. विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणा-या लोक अदालत धर्तीवर दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने व तडजोडीने हे महसुली दावे कायमस्वरूपी निकाली काढल्यास अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताण कमी होऊन पक्षकारांची वेळेची व पैशांची बचत होईल. पुणे जिल्ह्यामध्ये राबविण्यात आलेल्या "महसूल लोक अदालत" उपक्रमाला मिळालेला यशस्वी प्रतिसाद विचारात घेता, असा उपक्रम राज्यस्तरावर राबविणे आवश्यक आहे.

समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय आणि हक्क पोहोचवणे हे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचे मूळ सूत्र होते. शेतक-यांसाठी त्यांनी केलेले काम अमिट आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून, राज्यात महसूल विभागांतर्गत प्रलंबित असलेली अर्धन्यायिक प्रकरणे जलद गतीने व तडजोडीने निपटारा करण्यासाठी **"महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान"** आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

१) राज्यात महसूल विभागांतर्गत प्रलंबित असलेली अर्धन्यायिक प्रकरणे आपापसातील तडजोडीने व सहमतीने निकाली काढण्यासाठी राज्यभरात **"महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान"** दि. १ सप्टेंबर, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०२७ या कालावधीमध्ये राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर अभियानामध्ये मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार,तहसीलदार,उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) व अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा /अपीलांचा समावेश असेल.

३) या अभियानाअंतर्गत तीन महिन्यातून **एकदा** सर्व स्तरांवर (मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकारी) लोक अदालतीचे आयोजन करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची राहील.

४) सदर अभियानातंर्गत सर्व दाव्यांमधील पक्षकारांना नोटीस जारी करणे, तडजोड योजनेअंतर्गत अर्ज स्वीकारणे, प्राप्त अर्जांची छाननी व तडजोडनामा तयार करणे, महसूल लोक अदालत पूर्वतयारी बैठक व प्रत्यक्ष महसूल लोक अदालत आयोजन याबाबत जिल्हाधिका-यांनी वेळापत्रक निश्चित करून त्यानुसार महसूल लोक अदालतीचे आयोजन करावे.

५) **अभियानाची कार्यपद्धती:**

अ) **अर्ज प्रक्रिया:** ज्या अर्धन्यायिक न्यायालयात /कार्यालयात महसुली दावा प्रलंबित असेल (उदा. मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, अपर जिल्हाधिकारी इ.), तेथे दोन्ही पक्षकार यांनी किंवा त्यांच्या वकिलांमार्फत सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-अ"** मधील नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज सादर करावा.

आ) **छाननी व तडजोडनामा:** प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षांच्या संमतीची खात्री केली जाईल व त्यांच्याकडून कायदेशीर तडजोडनामा (Consent Terms) प्राप्त करून घेण्यात यावा.

इ) **अंतिम निकाल:** निश्चित केलेल्या लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या सहमतीने प्रलंबित दाव्यांवर अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यात यावे.

६) या अभियानाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, उप विभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच फ़लकाद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. मंडळ अधिकारी कार्यालय व ग्राम महसुल अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये या अभियानाबाबत सविस्तर माहितीचे फ़लक प्रसिद्ध करावे.

७) जिल्हाधिकारी यांनी या अभियानाबाबत सर्व प्रकारच्या प्रसिद्धीमाध्यमांमध्ये व्यापक प्रसिद्धी द्यावी.

८) राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी या मार्गदर्शक सूचनांनुसार आपापल्या जिल्ह्यांत जिल्हा, तालुका व गावपातळीवर हे अभियान प्रभावीपणे राबवावे आणि याच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन अहवाल विभागीय आयुक्तांना सादर करावा. विभागीय आयुक्तांनी आढावा घेऊन सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-ब"** मध्ये त्रैमासिक अहवाल शासनास सादर करावा.

९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी या अभियानाची राज्यव्यापी प्रसिद्धी करावी व अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीचे वृत्त माध्यम विश्वात प्रसिद्ध करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१८२३२८१६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ALIM KASAM SHAIKH

Digitally signed by ALIM KASAM SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=eb94bc5909bc09ea8af595d8272c41b115d8dcb663c1c86ea5c28f440b9941b6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BF6C47351380519AD427282F3DCD4A6671ACD6A9E5168D415AD17E965DCF225C, cn=ALIM KASAM SHAIKH
Date: 2026.08.13 18:26:23 +05'30'

(अलिम शेख)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३२

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.

३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास )यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२

४) मा.उपमुख्यमंत्री ( उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक, क्रीडा व युवक कल्याण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई-३२

५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२

६) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२

७) सर्व जिल्हयांचे मा.पालकमंत्री यांचे खाजगी सचिव.

८) मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव

९) मा. लोकसभा / राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य

१०) मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य

११) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी ,मंत्रालय, मुंबई-३२

१२) सर्व विभागीय आयुक्त.

१३) जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

१४) नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

१५) सर्व जिल्हाधिकारी.

१६) संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, मंत्रालय, मुंबई - ३२

१७) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१८) सर्व उप विभागीय अधिकारी

१९) सर्व तहसिलदार

२०) निवड नस्ती, कार्यासन समन्वय -१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

“ प्रपत्र अ”

<u>महसूल लोक अदालत तडजोडनामा अर्ज</u>

१) अर्धन्यायिक न्यायालयाचे नाव : मंडल अधिकारी / नायब तहसिलदार/ तहसिलदार /उपविभागीय अधिकारी /उपजिल्हाधिकारी भूसंपादन /अपर जिल्हाधिकारी

२) पक्षकाराचे नाव व संपर्क क्रमांक :

३) महसुल दावा क्रमांक व वर्ष :

४) पक्षकार यांचे वकीलांचे नाव व संपर्क क्रमांक (आवश्यकतेनुसार):

५) जाबदेणार यांचे नाव व संपर्क क्रमांक :

६) जाबदेणार यांचे वकीलांचे नाव व संपर्क क्रमांक (आवश्यकतेनुसार) :

७) महसुल दाव्याचे थोडक्यात स्वरूप :

८) महसूल लोक अदालतीमध्ये दावा निकाली काढणेसाठी सहमती :

अपीलार्थी यांची स्वाक्षरी: अपीलार्थी यांचे वकील स्वाक्षरी (आवश्यकतेनुसार):

जाबदेणार यांची स्वाक्षरी: जाबदेणार यांचे वकील स्वाक्षरी (आवश्यकतेनुसार):

“ प्रपत्र ब ”

“महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान – त्रेमासिक प्रगती अहवाल”

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अभियानाअंतर्गत आयोजित केलेल्या महसूल लोक अदालतींची एकूण संख्या | निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |